ISSN 2231-6671

International Registered and Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

# Hi-TECH RESEARCH ANALYSIS

**(Refereed & Peer Reviewed Research Journal)**

Year - VI, Issue - XII, Vol.- III

Impact Factor 2.0082
(GRIFI)

Aug. 2016 To Jan. 2017

Degloor College, Degloor
Dist. Nanded

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

EDITOR IN CHIEF

DR. BALAJI KAMBLE

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

IMPACT FACTOR 2.0082

ISSN 2231-6671

International Registered & Recognized
Research Journal Related to Higher Education for all Subjects

Hi-Tech Research Analysis

# Hi-TECH
# RESEARCH ANALYSIS

## REFEREED & PEER REVIEWED RESEARCH JOURNAL

**Issue : XII, Vol. - III**
**Year - VI, (Half Yearly)**
**Aug. 2016 To Jan. 2017**

**Editorial Office :**
'Gyandev-Parvati',
R-9/139/6-A-1,
Near Vishal School,
LIC Colony,
Pragati Nagar, Latur
Dist. Latur - 413531.
(Maharashtra), India.

**Contact : 02382 - 241913**
09423346913 / 09503814000
07276305000/ 09637935252

**Website**
**www.irasg.com**

**E-mail :**
interlinkresearch@rediffmail.com
visiongroup1994@gmail.com
mbkamble2010@gmail.com

**Published by :**
JYOTICHANDRA PUBLICATION
Latur, Dist. Latur - 413531 (M.S.)India

**CHIEF EDITOR**

**Dr. Balaji G. Kamble**
Research Guide & Head, Dept. of Economics,
Dr. Babasaheb Ambedkar Mahavidyalaya,
Latur, Dist. Latur.(M.S.) (Mob. 09423346913)

**EXECUTIVE EDITORS**

**Scott. A. Venezia**
Director, School of Business,
Ensenada Campus,
California, (U.S.A.)

**Dr. Balaji K. Shinde**
Member of Academic Council,
S.R.T.M.U. Nanded. (M.S.)

**Dr. Omshiva V. Ligade**
Head, Dept. of History
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**Bhujang R. Bobade**
Director Manuscript Dept.,
D. A. & C. Research Insititute,
Malakpet, Hyderabad. (A.P.)

**Dr. U. Takataka Mine**
Tokiyo (Japan)

**Dr. Babasaheb M. Gore**
Dean- Faculty of Education & M.C.
Member,S.R.T.M.U, Nanded.(M.S.)

**Dr. Khanderavaji Kale**
Dept. of Sociology,
College of Arts,
Kowad, Dist. Kolhapur. (M.S.)

**Dr. Balaji S. Bhure**
Dept. of Hindi,
Shivjagruti College,
Nalegaon, Dist. Latur.(M.S.)

**DEPUTY-EDITOR**

**Dr. G . V. Menkudale**
Dept. of Dairy Science,
Mahatma Basweshwar College,
Latur, Dist. Latur.(M.S.)

**Dr. C.J. Kadam**
Head, Dept. of Physics,
Maharashtra Mahavidyalaya,
Nilanga, Dist. Latur.(M.S.)

**Dr. Murlidhar Lahade**
Dept. of Hindi,
Janvikas Mahavidyalaya, Bansarola,
Dist. Beed.(M.S.)

**Dr. Bharat S. Handibag**
Dean, Faculty of Arts,
Dr. B.A.M.U. Aurangabad(M.S).

**Dr. S.B. Wadekar**
Dept. of Dairy Science,
Adarsh College,
Hingoli, Dist. Hingoli.(M.S.)

**Dr. Shivaji Vaidya**
Dept. of Hindi,
B. Raghunath College,
Parbhani , Dist. Parbhani.(M.S.)

**CO-EDITORS**

**Dr. R.N. Salve**
Head, Dept. of Sociology,
Shivaji University,
Kolhapur, Dist. Kolhapur.(M.S.)

**Ghansham S. Baviskar**
Dept. of English,
... College

**Dr. Kailash Tombare**
Head, Dept. of Economics,
Devgiri Mahavidyalaya,
Aurangabad.(M.S.)

**Dr. Kailash R. Nagulkar**
Head, Dept. of History,
Gulab Nabi Azad College,
...Takli, Dist. Akola.(M.S.)

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author(s) | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Customer Relationship Management in Banking | Shivaji S. Kate | 1-6 |
| 2 | The role of Online marketing Relationship with Customer | Dr. D. G. Patil | 7-11 |
| 3 | A Critical Review : Multiculturalism | Vivekanand Wahule | 12-19 |
| 4 | Contract Lectures in Colleges : Will it Improve Education | Shahu D. Gawade | 20-23 |
| 5 | Physico- Chemical Properties of Ground Water of Akkalkot Taluka in Solapur Dist. of Maharashtra | S. A. Birajadar, A. D. Babare, Dr. M.G. Babare | 24-27 |
| 6 | छायावादी कविता की पृष्ठभुमि - एक परिचय | तानाजी विठ्ठलराव भोसले | 28-32 |
| 7 | भारतीय अर्थव्यवस्थेत लघु उद्योगांचे महत्व | डॉ. अशोक पी. चौधरी | 33-36 |
| 8 | सहकारी बॅकांची रचना आणि कार्य | गोपाल तडस | 37-41 |
| 9 | जागतिक आर्थिक असंतुलन | एन. बी. मठपती | 42-44 |
| 10 | खानदेशातील एकोणिसाव्या शतकात साखर तयार करण्याची प्रक्रिया | डॉ. नानाजी दगा भामरे | 45-51 |
| 11 | महिलांचे राजकीय सबलीकरण आणि आरक्षणाचे धोरण - एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. रत्नाकर बी. लक्षटे | 52-59 |


ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist. Nanded *

Issue - XII, Vol. III
HI-TECH RESEARCH ANALYSIS
IMPACT FACTOR 2.0082
ISSN 2231-6671
Aug. 2016 To Jan. 2017

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

11

# महिलांचे राजकीय सबलीकरण आणि आरक्षणाचे धोरण - एक विश्लेषणात्मक अभ्यास

**डॉ. रत्नाकर बी. लक्षटे**
राज्यशास्त्र विभाग,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड (महाराष्ट्र) भारत

## Research Paper - Political Science

**प्रस्तावना :**

ज्ञान, विचार, अर्थ आणि सूचना ई. क्षेत्रात योग्य भागिदारी प्राप्त करणे तसेच कुटूंब, समाज, समुह आणि राष्ट्राच्या धोरण-निर्धारण प्रक्रियेवर नियंत्रण स्थापित करण्याच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणून महिला सबलीकरणास अलिकडील काळात परिभाषित करता येते. वास्तवतेत महिलांचे सबलीकरण, विश्व, विकास प्रक्रियेचा मुख्य मुद्दा असावा, अशी भुमिका नोबेल पुरस्कार विजेते अमर्त्य सेनची आहे.

महिला सबलीकरणाचे प्रयत्न बऱ्याच वर्षापासून प्रारंभ झाले. परंतु महिलांच्या सबलीकरणासाठी त्यांचा राजकारणातील सहभाग अत्यंत आवश्यक मानला जातो. काहीचे तर मत असे आहे की, मानवता, राष्ट्रीयत्व आणि जगाचा विकास महिलांच्या राजकीय सहभागाशिवाय योग्य दिशेने जावू शकत नाही. महिला सबलीकरणाशी संबंधित सर्व घटक आंतरसंबंधित आहेत. संपूर्ण जगातील महिलांच्या स्थितिवर नजर टाकल्यास एक गोष्ट स्पष्ट होते की, भारतासह संपूर्ण जगात महिलांचे आर्थिक, शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील योगदान वाढत आहे. तर दूसरीकडे राजकीय क्षेत्रातील महिलांचे प्रतिनिधीत्व जवळपास नगण्य आहे. इ.स.२०१२ मध्ये जगातील कायदेमंडळात महिलांच्या प्रतिनिधीत्वाचे प्रमाण १८% होते. त्यामुळेच महिलांच्या राजकीय सबलीकरणाची आवश्यकता व्यक्त केली जाते. आज जगातील सर्व देशांकडून महिलांच्या नेतृत्व शक्तिचा विकास करुन राजकारणातील सहभागित्व वाढविण्याच्या विषयावर गांभीर्याने विचार होत आहे. तसेच त्या दिशेने प्रयत्न ही होत आहेत. अशा प्रकारे महिलांच्या राजकीय सहभागित्वातून महिला सबलीकरण करण्याचे प्रयत्न होत आहेत. या अनुषंगाने एक बाब समोर आली की, महिला

अनादीकाळापासून शोषणग्रस्त जीवन जगत आहेत. ज्यांना बऱ्याच काळापासून प्रतिनिधीत्व, मतदान आणि नागरिकत्वापासून वंचित ठेवण्यात आले. कोणत्याही प्रकारचे संरक्षण आणि तरतुदींशिवाय राजकीय क्षेत्रात महिला पुरुषांबरोबर उभ्या राहतील का ? विषमतेनेयुक्त समाजात समानता स्थापन करता येईल का ?

**संशोधनात्मक आराखडा :-**

महिलांचा राजकीय सबलीकरणाचा आरक्षण हा एक महत्वाचा आधार व उपाय आहे हे गृहीत प्रमाण मानुन प्रस्तुत लेखात विवेचन केले आहे. भारतीय राजकारणातील मागील ०४ दशकाच्या राजकारणापासून महिला सबलीकरण आणि ३३% आरक्षणाची चर्चा सुरु आहे. त्याची नेमकी वर्तमान दिशा व दशा जाणुन घेण्याच्या हेतूने मांडणी करण्यात आली. प्रस्तुत लेखातून महिला सबलीकरणाशी संबंधीत फक्त आरक्षणाच्या मुद्याबाबतच चर्चा करण्यात आली आहे. महिला आरक्षण आणि राजकीय सबलीकरणाशी संबंधित तर्क-वितर्क, मत-मतांतरांना समजून घेण्याच्या दृष्टीने या लेखाची उपयुक्तता आहे. प्रस्तुत लेखाच्या मांडणीस उपयोजिता मूल्य व अर्थपूर्णता प्राप्त व्हावी म्हणून या विषयाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेल्या कांही मुलभूत व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आला तसेच कांही तज्ञ अभ्यासक, महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनी व स्थानिक राजकारणात कार्य करणाऱ्या महिला उमेदवाराशी चर्चा करण्यात आली. त्यामुळे या विषयाच्या मांडणीत अनुभववादी अभ्यासपध्दती उपयुक्त ठरली.

या सर्वबाबी लक्षात घेवूनच प्रस्तुत लेखात महिला आरक्षणातुन महिलांच्या राजकीय सबलीकरणाशी होणाऱ्या शासकीय प्रयत्नांची समीक्षा करण्याचा प्रयत्न केला आहे. भारतात स्वातंत्र्यापासूनच राज्यघटनेने सर्व नागरिकांना समतेचा हक्क दिला. परंतू सत्य हे आहे की, व्यावहारिक दृष्ट्या या हक्कांचा उपभोग सर्वांनाच सम्प्रमाणात घेता आला नाही. सामाजिक, आर्थिक क्षेत्रात आजही जात, धर्म, लिंग इ.च्या आधारावर भेदभाव आणि अन्याय केला जातो. या सामाजिक आर्थिक क्षेत्रातील अन्याय आणि भेदभावाला ओळखून त्यास दूर करण्यासाठी संविधानामार्फत कांही सकारात्मक उपाय करण्यात आले. या सर्व उपायात एक महत्वाचा उपाय ज्याचा सामाजिक न्यायाशी जवळचा संबंध आहे, तो म्हणजे आरक्षण होय. ज्याचा प्रथम वापर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीसाठी स्विकारण्यात आले परंतू महिलांचा सामाजिक दर्जा सुधारण्यासाठी आरक्षणास एक चुकीचे पाऊल मानून प्रारंभापासूनच महिला नेत्यांनी त्यास अमान्य केले. तसेच संविधान सभेनेही या विषयावर चर्चा करणे किंवा महिला प्रतिनिधीत्व वाढविण्याबाबतीत विचार केला नाही.

राजकारणात महिलांच्या प्रवेशाबाबतचा योग्य कायदा न करण्यामागे त्याकाळात अनेक कारणे सांगितली जातात. प्रथमतः राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीतील सक्रिय महिलांनी समाजातील प्रचलित नियम आणि परंपरांना तोडून घरातून बाहेर निघण्याचे धाडस दाखवले. त्या आपणास मागास किंवा कमकुवत मानून पुरुषांकडून कोणतीही मदत मागत नाहीत. त्यांच्या मते आम्हास पुरुषांच्या बरोबर समजावे. समतेच्या या विचारधारेत विशेषत्वाची तरतूद योग्य वाटत नाही. दूसरे स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होणाऱ्या महिला, उच्च वर्गातून व जातीतून होत्या. त्या सुशिक्षित व

ADARSH SHIKSHAN EDUCATION SOCIETY DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded

संपन्न होत्या. त्यांना विशेष सुविधा मिळाल्या होत्या. त्या स्वतःस दयनीय अवस्थेत ठेवू शकत नव्हत्या. एका विशिष्ट वर्गात जन्म झाल्यामुळे त्या स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या. दुसऱ्या बाजूने या सर्व पार्श्वभुमीमुळे बहुसंख्यांक निम्न वर्ग आणि जातीतील महिलांच्या अनुभवांकडे लक्ष देण्यात आले नाही. तिसरे समाजवादी महिलांनी विशेष तरतुदींना वर्गीय राजकारणाच्या आधारावर मानण्यास विरोध केला. त्यांच्यासाठी महिलांचे स्वातंत्र्य देशाच्या स्वातंत्र्यासोबतच जोडलेले होते. या सर्व कारणांमुळे राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळी दरम्यान राजकीय संस्थात महिलांसाठी आरक्षणाचा मुद्दा प्रभावी बनला नाही. तरीही राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत महिलांचा अधिक संख्येने होणाऱ्या सहभागाने, स्वतंत्र भारताच्या संविधानाने, त्यांना प्रत्येक प्रकारच्या समतेचा मुलभूत अधिकार मिळवून दिला.

भारतीय राजकारणात १९७० च्या दशकाच्या प्रारंभापर्यंत महिला आरक्षणाचा मुद्दा एक प्रकारे शिथिल पडला होता. कारण तोपर्यंत भारतातील महिलांच्या स्थितीवर गठित समितीने आपला अहवाल दाखल केला नव्हता. भारतीय महिलांची स्वतः राजकारणात येण्याच्या प्रक्रियेचा वेग अतिमंदावल्याचे समितीने अनुभवलेले होते. कारण भारतीय संस्कृति अराजकीय आहे. परंपरा महिलांच्या राजकीय सहभागित्वाविरुध्द आहेत. १९७४ च्या Committee on Status of Woman ने अंतर्गत विरोधाभासाचा अंदाज घेवून संसद आणि राज्य विधिमंडळात महिला आरक्षणाचा विचार सोडून दिला. परंतू ग्रामीण क्षेत्रातील महिलांसाठी कायदेशीर पंचायतीचे गठण करण्याची शिफारस केली. १९७०च्या दशकात कांही स्वायत्त महिला संघटनाचा उदय झाला. त्यांनी महिला चळवळ औपचारिकरित्या राजकीय संस्था आणि शक्ति संघटनातील संबंधाना प्रामुख्याने मांडले.

१९८५ च्या राजीव गांधी शासनाने महिलांच्या विषयाला प्राधान्य दिले. ज्याचा एक भाग म्हणून समाज कल्याण विभागाअंतर्गत महिला विभागाची स्थापना करण्यात आली. तसेच या महिला विभागास लवकरच महिला आणि बाल कल्याण विभागात रुपांतरित केले. त्यासोबतच भारत शासनामार्फत महिलांसाठी एक राष्ट्रीय परिप्रेक्ष्य योजना (National Perspective plan १९८८ to २०००) बनवण्याची घोषणा करण्यात आली. त्यासाठी एक समिती बनवण्यात आली. या दरम्यानच १९८५ ला नैरोबीत पहिल्या आंतरराष्ट्रीय महिला सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले. यात पहिल्यांदाच महिला सबलीकरण या शब्दाचा वापर करण्यात आला. त्यामुळे या विषयाला अधिक ओळख आणि मान्यता प्राप्त झाली. NPP द्वारा गठित केलेल्या समितीमार्फत प्रस्तुत मसुदा सोबत भारतात पुन्हा महिला आरक्षणावर चर्चेचे नवे युग प्रारंभ झाले. NPP ने महिलांचे राजकीय क्षेत्रातील सहभागीत्व कमी होण्याचे अनेक कारणे सांगितली. महिलांच्या सहभागीत्वास वाढविण्यासाठी विशेष तरतुदींची आवश्यकता स्पष्ट केली. NPP ने आपल्या शिफारशीत पंचायतीपासून संसदेपर्यंत शासकीय समित्या आणि आयोगासोबतच राजकीय पक्षातही ३०% जागा महिलांसाठी आरक्षित असाव्यात अशी शिफारस केली. परंत NPP ने अंतिम अहवालात

६४ वे आणि ६५ वी घटनादुरुस्ती मांडली. परंतू त्यावेळेस त्या कायद्यात रुपांतरीत होवू शकल्या नाहीत. १९९३ मध्ये नरसींहराव सरकारने पून्हा ग्रामीण आणि शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांत महिलांसाठी १/३ जागा आरक्षित करण्यासाठी ७३ वे ७४ व्या घटनादुरुस्ती विधेयकास मांडले. ज्यास बहुमताने स्विकारण्यात आले. अशाप्रकारे देशाची आर्धी लोकसंख्या असणाऱ्या महिलांना स्थानिक संस्थांत ३३% जागा आरक्षित करण्यात आल्या.

१९९३ आणि १९९६ दरम्यान संसद आणि राज्य विधानसभेत महिलांना जागा आरक्षित करण्याची मागणी तीव्रतेने करण्यात आली. या दबावामुळे संयुक्त मोर्चा आघाडी शासनाने महिलांना संसद आणि राज्य विधानसभात ३३% जागा आरक्षित करण्याची घोषणा केली. त्याच्या अंमलबजावणीसाठी १२ सप्टेंबर १९९६ ला भारतीय संसदेत महिला आरक्षण विधेयक मांडले. परंतु तेंव्हापासून ते आतापर्यंत भारतीय संसदेत हे विधेयक अनेकवेळा ठेवण्यात आले. तरीही त्यास आजपर्यंत कायद्याचे स्वरुप प्राप्त झाले नाही. श्रीमती गीता मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली संसदेची संयुक्त समिती आणि डॉ.नलचिनपन यांच्या अध्यक्षतेखाली संसदेची स्थायी समितीने या प्रश्नावर विचार केला. महिला आरक्षण विधेययकाच्या १५ वर्षाच्या इतिहासात पहिल्यांदा असे घडले की, २०१० साली संयुक्त पुरोगामी आघाडी शासनाने यांस संसदेच्या राज्यसभेत मांडले. बऱ्याच चर्चारुपी गोंधळानंतर राज्यसभेमार्फत त्यास पास करण्यात आले. परंतु या विधेयकाची वास्तव परिक्षा लोकसभा आणि राज्य विधानसभांनी पास करण्यात आले जे आतापर्यंत झाले नाही.

प्रस्तुत विधेयकास १०८ व्या घटना दुरुस्ती विधेयकाच्या रुपात ओळखले जाते. ज्यात महिला आरक्षणाचा कालावधी १५ वर्षे ठेवला होता. तसेच यात लोकसभा आणि राज्य विधानसभा १/३ जागा महिलांना आरक्षित करण्याचा मुद्दा उल्लेखित होता. तसेच अनुसूचित जाती आणि जमातींना देण्यात आलेल्या आरक्षणाअंतर्गतच १/३ जागा त्याच वर्गांच्या महिलांसाठी आरक्षित करण्याची तरतूद केली. याच विषयावर अधिक प्रमाणत महिला आरक्षण विषयावर वाद-विवाद आहेत. ज्यात प्रामुख्याने खालील मुद्यांचा समावेश होतो.

१) महिला आरक्षणामुळे फक्त राजकीय पार्श्वभुमी आणि संपन्न घराण्यातीलच महिला राजकारणात प्रवेश करतील. यातून सर्व वगातील महिलांचे सबलीकरण होणार नाही.

२) महिला आरक्षण विधेयक लोकशाही आणि समतेच्या सिध्दांताविरुध्द आहे. ज्यात कांही जागा महिलांसाठी आरक्षित करुन अन्य व्यक्तींना तेथून निवडणूक लढविण्याच्या स्वातंत्र्यापासून वंचित केले जाते.

३) या विधेयकामुळे महिलांसाठी फक्त ३३% जागा आरक्षित करण्यात आल्या. त्यास वाढवून महिलांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात करण्याची मागणी होत आहे.

४) महिला आरक्षण विधेयकाद्वारे प्रस्तुत चक्रीय व्यवस्थेत महिलांसाठी निवडलेल्या जागांना स्थिर ठेवले नाही.
[illegible] लोकांना अवघड होईल.

कोणती जागा हिसकावून घेण्यात आली. तसेच त्यातून उत्तरदायित्वाची ही भावना नष्ट झाली.

५) महिला आरक्षणामुळे असा समज विकसित होईल की, इतर सर्व जागा पुरुषांसाठी आरक्षित आहेत.

६) याशिवाय जो एक विषय वादग्रस्त आहे तो म्हणजे महिला आरक्षणाअंतर्गत अनेक वर्गाच्या महिलांसाठी वेगवेगळ्या आरक्षणाची केलेली मागणी होय. यास काही राजकीय पक्ष आणि महिला संघटनांचे समर्थन आहे. त्यांच्यामते या आरक्षणात महिलांना एक संपूर्ण वर्ग म्हणून स्विकारण्यात आले नाही. महिला स्वत: एक वर्ग नसून त्यात अनेक वर्ग आहेत. त्यांना त्या वर्गानूसार आरक्षण मिळावे.

७) फक्त महिला उमेदवाराच्या विरुध्द निवडणूक लढवण्याने महिलांच्या वास्तविक शक्तींचा विकास होणार नाही.

८) यात अशाच महिला राजकारणात येतील ज्यांच्या जागेवर त्यांच्या कुटूंबातील पुरुषांकडून कार्य केले जाते.

९) महिला आरक्षणाच्या कालावधीबाबतही आणखी एकमत झाले नाही.

१०) महिला आरक्षण सर्वोच्च न्यायालय मार्फत निर्धारित आरक्षणाच्या ५०% पार होईल.

राजकीय पक्ष आपल्या पितृसत्ताक ओळख व व्यक्तिमत्वामुळे महिलांना प्रतिनिधीत्व देवू इच्छित नाहीत. परंतू महिला आरक्षण आवश्यक आहे. महिलांचा राजकारणातील प्रवेशामुळे महिला प्रतिनिधींची संख्या वाढेल त्या एक शक्तिशाली समुह बनुन आपल्या मागण्या मांडतील. महिलांचा राजकारणातील प्रवेश संसदेला नवी दिशा देणारा असेल ज्यातून स्वच्छ व पारदर्शक राजकारणाचा विकास होईल. वाद-विवादाच्या दिशेत बदल होईल.

**विरोधात :-**

- आरक्षणाची तरतूद संविधानातील व्यक्त समतेच्या सिध्दांताविरुध्द आहे.
- महिलांचे हित व कल्याण समाजापासून वेगळे नाही.
- या व्यवस्थेमुळे समाजातील इतर वर्गही अशाच एकात्मतेला धोका होईल.

जर आपण महिला आरक्षणाबाबतच्या वाद-विवादावर प्रकाश टाकला तर जाणवते की, येथे एकवर्ग याच्या बाजूने आणि विरोधात अनेक तर्कवितर्क स्पष्ट करतो. तसेच याच्या समर्थक आणि विरोधकातही दोन वर्ग आहेत.

**महिला आरक्षणाचे समर्थन करणाऱ्यांची दोन मते :-**

- एक अनादिकाळापासून महिलांचे शोषण झाले त्यामुळे त्यांना समान दर्जा देण्यासाठी आरक्षणाची व्यवस्था आवश्यक आहे. याचे समर्थन डावे पक्ष आणि कांही स्त्रीवादी संघटनामार्फत केले जाते. उदा.प्रेमिला दंडवते, मार्गारेट अल्वा, वीना नायर ई.
- दुसरे जातीच्या आधारावर या आरक्षणाने

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist. Nanded

दल आणि राष्ट्रीय मुलायमसिंह यादव, लालू प्रसाद यादव आणि उमा भारतींचा समावेश होतो.

**महिला आरक्षणाच्या विरोधातील दोन प्रवाह :-**

एकमत जे स्त्रीवादी आहे. ज्यांच्या मते महिला आरक्षणामार्फत फक्त काही संपन्न घराण्याच्या मुलीं व महिलांना फायदा होईल. या संपन्न घराण्यातील महिला जाणीव जागृती आणि महिला हिताच्या आधाराऐवजी आपल्या राजकीय पार्श्वभुमी आणि पैश्याच्या आधारावर निवडुन संसदेत जातील. त्यामुळे अन्य महिलांना पुढे जाण्याची संधी मिळणार नाही. तसेच या संपन्न घराण्यातील महिला इतर महिलांच्या प्रश्नांना विषयांना पुर्णत: मांडु शकणार नाहीत. त्यामुळे याचे समर्थन आरक्षणाच्या ऐवजी इतर तरतुदींची मागणी करत आहेत. उदा : अनुप्रतिक प्रतिनिधीत्व किंवा बहुसदस्यीय निर्वाचन क्षेत्र. या समर्थकात मधु किश्वर, सतकारी महिला संघटना (एस.एम.ए.) नावाच्या कृषी महिला संघटना.

दुसरा प्रवाह आरक्षण किंवा कोणत्याही प्रकारच्या विशिष्ट तरतुदींना विरोध करतो. त्यांचे विचार सर्वांना समान नागरिक मानून समान अधिकार देण्याचे समर्थन करतात. वर्तमानात अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील महिला आरक्षणाची वास्तविकता विचारात घेवून आरक्षण सबलीकरणाचे साधन होवू शकत नाही. या मताचे समर्थन प्रसार माध्यमातील कांही व्यक्तिगत विश्लेषकांमार्फत केले जाते.

महिलांसाठी आरक्षणाशिवाय इतर कांही उपाय महिलांच्या राजकीय सबलीकरणासाठी सुचवले जातात. ज्यात

१) राजकीय पक्षांतर्गत महिलांसाठी जागा आरक्षित करणे ज्याचा स्वीकार इतर अनेक देशांनी केला.

२) द्विसदस्यीय मतदारसंघाची निर्मिती ज्या अंतर्गत प्रत्येक मतदारसंघातून दोन प्रतिनिधींची निवड करावी. ज्यात एक महिला असावी.

३) जर यास राजकीय पक्षांच्या इच्छेवर सोडले तर अशी शक्यता आहे की, ज्या मतदारसंघातून महिला प्रतिनिधी निवडून येवू शकतो तेच मतदारसंघ महिला प्रतिनिधींना दिले जाईल.

४) द्विसदस्यीय मतदारसंघातील कार्याचे विभाजन करताना महिलांना द्वितीय स्थानच मिळेल. तसेच संसद आणि राज्य विधानसभा संख्येत दुप्पट वाढ होईल. ज्याला सांभाळणे व समन्वय राखणे कठिण जाईल.

महिला आरक्षण एक विवादास्पद मुद्दा आहे. ज्याच्या प्रयोगाने महिला प्रतिनिधीत्वास जागतिक स्तरावर [illegible] नवो व लांब पल्याची उडी मारली आहे. निवडणुकीत महिलांच्या आरक्षणाने महिलांच्या राजकीय प्रतिनिधीत्व [illegible] सामाजिक, आर्थिक स्थितीशी संबंधित उपलब्ध विचार आणि सिध्दांताला एक नवीन आव्हान दिले. त्याचे [illegible] की महिला आरक्षणातून महिलांच्या सामाजिक, आर्थिक पृष्ठभुमीत बदल होईल. महिला प्रतिनिधीत्वास [illegible] जगातील अनेक देशात महिलांना बरोबरीचा दर्जा मिळावा म्हणून आरक्षणास सकारात्मक [illegible] विभिन्न जाती आणि समुहातील

मतभेदात सामंजस्य स्थापन करण्याच्या उद्देशाने स्विकारण्यात आले. बऱ्याच कालावधीपासून फिनलँड, नॉर्वे तथा स्विडन जगातील महिला प्रतिनिधीत्वाच्या बाबतीत प्रगत आहेत. परंतू १९७० च्या नंतर लिंगाधारित आरक्षणातून अर्जेंटिना, युगांडा, दक्षिण आफ्रिका, बोस्निया, हरजेगोविना, फ्रांस आणि कोस्टारिका इ. देशांनी राजकीय क्षेत्रातील महिलांच्या प्रतिनिधीत्वात तीव्र बदल केले. २००३ च्या निवडणुकीत खंडात महिला आरक्षणाच्या स्पर्धेतून स्वीडनला जगातील महिला प्रतिनिधीत्वाच्या स्थानातून नंबर एकच्या स्पर्धेतून हटवले. खंडात झालेल्या निवडणुकीनंतर नव्या घटनात्मक शासनाने महिलांनी स्वीडनच्या ४५-३१ च्या स्पर्धेत ४८-८ जागा मिळवल्या.

आज जवळपास ४० देशांत राष्ट्रीय विधानमंडळाच्या निवडणुकीत लिंगावर आधारित आरक्षण आहे. मग ते घटनादुरुस्ती करुन किंवा कायद्यात बदल करून असेल याशिवाय ५० पेक्षा अधिक देशात राजकीय पक्षांनी स्वईच्छेने आपल्या राज्यघटनेत आरक्षणाची व्यवस्था केली. तर कांही देशात दोन्ही प्रकारच्या आरक्षणाचा स्विकार करण्यात आला.

महिला आरक्षणाशी संबंधित होणाऱ्या वाद-विवादातून महिला आजही समाजाचा कमकुवत घटक असल्याचे स्पष्ट होते. त्यांच्या सबलीकरणासाठी विशेष प्रयत्न आणि तरतुदींची आवश्यकता आहे. राजकीय क्षेत्रात त्याची अधिक आवश्यकता आहे. कारण की, इतर क्षेत्राच्या तुनलेने राजकारणात महिलांचे प्रमाण खुप कमी आहे. तर दूसरीकडे एक प्रतिनिधी लोकशाहीत सार्वजनिक धोरणांना पूर्ण समुहाच्या क्षमतेने निर्धारित करावे लागते. या संदर्भाने एका समुहाच्या रुपात महिलांच्या राजकीय सबलीकरणाची आवश्यकता निर्माण होते. कारण त्याही सार्वजनिक धोरणांना प्रभावित करण्यात सक्षम बनतील. माझ्या मते महिला सबलीकरणाच्या प्रक्रियेला तीव्र करण्यासाठी अनेक स्तरावर प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. तर दुसऱ्या बाजुने समाज, राजकारण व अर्थकारणातील दोषांचे निवारण करावे लागेल.

राजकरणातील भाई-भतीजावाद, भ्रष्टाचार आणि शक्तीच्या राजकारणाला नष्ट करावे. लैंगिक संवेदनशीलता निर्माण करावी. आर्थिक स्वावलंबनता, निवडणूकीतील अधिक खर्च, सार्वजनिक जीवनातील महिलांच्या सहभागीत्वाचा न्यूनतम प्रमाण आणि हिंसा तसेच चरित्र हणणाच्या प्रयत्नांना दूर करावे लागेल. याचा अर्थ एक स्वस्थ आणि स्वच्छ राजकीय वातावरण निर्माण करावे लागेल. महिलांना वारंवार राजकीय कार्याचे प्रशिक्षण द्यावे लागेल. निवडणूकीत उमेदवारी देताना त्याच महिलांना प्राधान्य व प्रथम क्रमांक द्यावा ज्यांना गाऊंड स्तरावर राजकीय अनुभव आणि प्रशिक्षण मिळवले आहे. परंतू वर्तमान भारतीय राजकारणात महिलांच्या सहभागीत्वास वर्तमान स्थितीवर सोडता येत नाही. त्यासाठी काही उपाय करावे लागतील. ज्यात आरक्षणाच्या व्यवस्थेला समाविष्ट करावे लागेल. कारण आरक्षणाची

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY, DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *



...र आणि संधी देण्याची हमी देण्याचा उल्लेख आहे. तसेच या प्रक्रियेत उपलब्ध महिला चळवळींची मदत घेणे ...ले आहे. महिलांना शासन आणि धोरण-निर्धारण संस्थांत सहभागी करुन घेण्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्यांना ...क आधार मिळते. तर दुसरीकडे त्यांच्या उपस्थितीमुळे धोरणासंबंधात वाद विवादात विविधता पूर्ण अनुभवाची ...ती होते.

## संदर्भ सूची :-


महिला सबलीकरण-स्वरुप आणि विकास-संपादक प्रा.पांडुरंग मुंढे, अरुणा प्रकाशन, लातूर-२०१६.

Human Rights & Social Justice-Chief Editor-Dr.S.D.Solanke, Organised by Development Political Sciences, Rajashri Shahu Mahavidyalay, Latur-२०१६.

२१st Century World : Present Scenario & Challenges - Editor Dr.Pandit Nalawade-२०१६.

भारतीय राजनीति विज्ञान शोध पत्रिका-संपादक-संजीवकुमार शर्मा-जनवरी-दिसंबर-२०११.

भारतीय राजनीति विज्ञान शोध पत्रिका-संपादक-मधुरेंद्र कुमार-अगस्त-दिसंबर-२०१३.

पंचायतीराज प्रशासन-डॉ.पारुल शर्मा, रितु पब्लिकेशन्स, जयपूर-२००७.

पंचायतीराज और महिला विकास-मधु राठौड-पॉईन्टर पब्लिशर्स-जयपूर-२००७.


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded